# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### कुलाबा-बांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गिकेसाठी कारशेड उभारण्याबाबत

**(१) ४०४० (१७-०७-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुलाबा-बांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गिकेसाठी गोरेगाव आरे येथील ३३ हेक्टर जागेवर कारशेड उभारले जाणार होते, मात्र ही जागा हरित पट्ट्यात येत असल्याने राज्याचे पर्यावरणमंत्री यांनी या कारशेडला विरोध दर्शविल्यामुळे मा.मुख्यमंत्र्यांनी दिनांक २९ नोव्हेंबर, २०१९ रोजी आरेतील कारशेडला स्थगिती दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिवाच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या ४ जणांच्या समितीने शासनास यापूर्वीच दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी सादर केलेल्या अहवालानुसार उक्त कारशेड आरे कॉलनीच्या बाहेर हलविणे अवघड असल्याचे नमूद केले असून आरेमध्ये आधीच वनजमिनीचे कारशेडच्या कामामुळे प्रचंड नुकसान झाले असल्यामुळे सदर कारशेड दुसऱ्या ठिकाणी करावयाचे झाल्यास प्रकल्पाला आणखी विलंब लागण्याची शक्यता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरे कारशेडच्या स्थगितीमुळे शासनास रोज अडीच कोटीचा तोटा सहन करावा लागत असून ज्यावेळी या प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यात आला होता त्यावेळी त्याचा खर्च २३ हजार कोटी इतका होता, आता तो वाढून विलंबामुळे ३३ हजार कोटी रुपयाहून अधिक झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी शासनास सादर करण्यात आलेल्या अहवालाची शासनस्तरावर तपासणीस विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन कुलाबा-बांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गिकेच्या कारशेडबाबत विनाविलंब योग्य तो निर्णय घेऊन कारशेडच्या उभारणीचे काम पूर्ण करण्याचेदृष्टीने निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०९-२०२२) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३), (४) व (५) मुंबई मेट्रो प्रकल्पांच्या कारशेडकरिता पर्यायी जागा निश्चित करण्यासंबंधी राज्य शासनास शिफारस करण्याकरिता माहे जानेवारी, २०२१ मध्ये मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने शासनास अहवाल सादर केला आहे. सदर अहवालमध्ये कारडेपोमुळे होणाऱ्या परिचालन, मेट्रो मार्ग-३, ४, ४-अ आणि ६ यांचेसाठी एकात्मिक कारडेपो कांजूरमार्ग येथे उभारण्याची शिफारस केली आहे. यासंबंधीच्या तांत्रिक बाबी तपासण्यात आल्या आहेत. सद्य:स्थिती कांजूरमार्ग येथील जागेच्या मालकी हक्कासंदर्भात मा.उच्च न्यायालयात दाखल केलेली रिट याचिका क्र. ५९८३/२०२० मध्ये मा.न्यायालयाने दिनांक १६/१२/२०२० रोजीच्या अंतरिम आदेशाद्वारे दिलेली स्थगिती या बाबी विचारात घेतल्यास प्रकल्प पूर्ण करण्यास होणारा विलंब टाळण्यासाठी आरे येथे कार डेपो उभारण्याबाबत दिनांक २९/११/२०१९ रोजी दिलेली स्थगिती शासनाच्या दिनांक २१/०७/२०२२ च्या पत्रान्वये उठविण्यात आली आहे. सद्य:स्थिती आरे येथे कार डेपो उभारणीचे काम प्रगतीत आहे.

---

## राज्यातील खेळाडूंना क्रीडा पुरस्कार जाहिर करण्याबाबत

**(२) ८९१० (२१-०६-२०२१) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात क्रीडा क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने गौरविण्यात येत असून सदरहू पुरस्कार योजना शासनाच्यावतीने सुरु असून गेल्या वर्षी कोविड-१९ महामारीमुळे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्पर्धा रद्द करण्यात आल्या, त्यामुळे यावर्षी शिवछत्रपती पुरस्कार जाहीर करताना कोणती पात्रता असणार आहे, याबाबत क्रीडा खेळाडूंमध्ये संभ्रम निर्माण झाला असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने स्पष्टता निश्चित केली आहे काय, क्रीडा पुरस्कार यावर्षी देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(३) असल्यास, राज्यातील शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त खेडाळूंना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार थेट नोकऱ्या देण्याचे शासनाचे धोरण आहे काय, शासनाच्या उक्त धोरणाची प्रत्यक्ष अमंलबजावणी करुन सांगली व पुणे महानगरपालिकेने पुरस्कार प्राप्त खेडाळूंना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार थेट नोकऱ्या दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, औरंगाबाद शहरातील शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेडाळूंना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार थेट नोकरी देण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेने दिनांक ११ जुलै, २०१८ रोजी सर्वसाधारण सभेत ठराव पारित करुनही त्याची प्रत्यक्ष अमंलबजावणी केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील खेळाडूंना क्रीडा पुरस्कार जाहीर करुन औरंगाबाद महानगरपालिकेने केलेल्या ठरावानुसार शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त विजेत्या खेडाळूंना शैक्षणिक पात्रतेनुसार थेट नोकरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०३-१०-२०२२) :** (१) व (२) शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराची नियमावली सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. सदर नियमावली अंतिम झाल्यानंतर शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३), (४) व (५) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक ०९ डिसेंबर, २०१० व दिनांक २१ मे, २०११ व दिनांक १० एप्रिल, २०१३ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार व क्रीडा प्राविण्याआधारे खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती दिली जाते. सदरचे क्रीडा विषयक प्राविण्य धारण न करता केवळ शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त खेळाडूंना थेट नियुक्तीसाठी पात्र ठरविण्याबाबत शासनाचे कोणतेही धोरण सद्य:स्थितीत अस्तित्वात नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर महानगरपालिकेची कर आकारणी एकसारखी नसल्याबाबत

**(३) ११०६३ (०५-०१-२०२२) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर महानगरपालिकेची कर आकारणी एकसारखी नसून एकाच प्रकारच्या आणि शेजारी-शेजारी असलेल्या मालमत्तांसाठी निरनिराळा कर आकारला गेला असल्याने महानगरपालिकेच्या कर संकलनावर विपरित परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर महानगरपालिकेच्या कर संकलनातून प्रचंड आर्थिक नुकसान होत असल्याने याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) :** (१) हे खरे नाही.

नागपूर महानगरपालिकेच्या सभागृहाने दिलेल्या मान्यतेनुसार नागपूर महानगरपालिकेच्या परिक्षेत्रामध्ये असणाऱ्या मालमत्तांना मालमत्ता कर आकरला जातो. याकरिता करयोग्य मूल्य निश्चित करताना मालमत्तेचे क्षेत्रफळ, मालमत्तेचे ठिकाण, मालमत्तेचा वापर, मालमत्ता इमारत असल्यास मालमत्तेचा बांधकाम प्रकार, बांधकामाचे वय याचा आधार घेतला जातो. महानगरपालिका सभागृहाने निश्चित केल्यानुसार वर्ष २०१३ च्या शिघ्र सिध्द गणक दराच्या आधारे मालमत्ता कर आकारणी केली जाते. उपरोक्तप्रमाणे ठरवून दिलेल्या मापदंडान्वये प्रत्येक मालमत्तेकरीता मालमत्ता कर आकारणी करण्यात येते. त्यामुळे प्रत्येक मालमत्तेची मालमत्ता कर आकारणी वेगवेगळी असू शकते.

(२) करयोग्य मुल्य निश्चित करणेची पध्दत तर्कसंगत व पारदर्शक असून कर संकलनामुळे कोणतेही आर्थिक नुकसान होत नाही. मालमत्ता कर संकलनात पूर्वीच्या तुलनेत वाढ झालेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहरातील तलावांचे जतन व संवर्धन करण्याबाबत

**(४) ११०६६ (०६-०१-२०२२) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहर परिसरात असलेल्या १० ते १२ तलावांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत १० ते १५ वर्षात सदर तलावांच्या संवर्धनाबाबत कोणतीही उपाययोजना व कार्यवाही झाली नसल्याने सद्य:स्थितीत सदर ११ तलावांना गटाराचे स्वरुप आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनुसार सदर तलावांचे जतन व संवर्धन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे. लेंडी तलाव, नाईक तलाव, बिनाकी मंगळवारी या तलाव परिसरात अंशत: अतिक्रमण आहेत.
(२) अंबाझरी, फुटाळा तलाव, नाईक तलाव व लेंडी तलाव यांचे प्रस्ताव राष्ट्रीय तलाव संवर्धन प्रकल्प (NLCP) व राज्य तलाव संवर्धन प्रकल्प (SLCP) अंतर्गत विस्तृत प्रकल्प अहवाल शासनाकडे मंजूरीस्तव सादर केले आहे.

- नागपूर शहरातील सोनेगाव, गांधीसागर व पांढराबोडी तलाव पुनरूज्जिवन प्रकल्प राज्य शासनाच्या राज्य तलाव संवर्धन प्रकल्पांतर्गत नागपूर महानगरपालिकेने पूर्ण केलेले आहे.
- राज्य शासनाने सोनेगाव व गांधीसागर तलाव सौंदर्यीकरण प्रकल्पास मंजूरी प्रदान केलेली असून त्याची कामे प्रगती पथावर आहे.
- सक्करदरा तलाव सौंदर्यीकरण प्रकल्पास राज्य शासनाने मंजूरी प्रदान केली असून प्रकल्पाची कामे निधी वितरीत न झाल्यामुळे संथ गतीने सुरू आहे.
- नागपूर महानगरपालिकेने नाईक तलाव पूनरुज्जिवन प्रकल्प राबविण्याकरीता निरी या संस्थेची नेमणूक केली आहे.
- पोलीस लाईन टाकळी तलावांतर्गत कायम स्वरूपी पायऱ्यांचे व तलावातील गाळ काढण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
- बिनाकी मंगळवारी तलाव सौंदर्यीकरण प्रकल्पाचा विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम विभागीय कार्यालयामार्फत करण्यात येईल.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे येथील कोपरी पुलाला तडे गेल्याबाबत

**(५) १११७९ (२०-११-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील नव्याने बांधण्यात आलेल्या कोपरी पुलाला तडे गेल्याने सदरहू पुलाचे काम हे निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचा आरोप एका राजकीय पक्षाने आंदोलन करून केल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुलाला तडे गेल्याने सदर पुलावरुन प्रवास करणे धोक्याचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनुसार सदर नवीन पुलाला तडे जाण्याची कारणे काय आहेत, तसेच उक्त प्रकरणी दोषी असणाऱ्या कंत्राटदार व अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०९-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

ठाणे येथील नव्याने बांधण्यात आलेल्या कोपरी पुलाच्या मुख्य भागात कोणताही दोष नसून पुलाच्या पोचमार्गाच्या कॉंक्रिट रस्त्यामध्ये तडा गेला होता.याबाबत आंदोलन झाले होते हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदर पुलावरुन दिनांक ०९/१०/२०२१ रोजीपासून वाहतूक अव्याहतपणे सुरु आहे.

(३) सदर प्रकरणी आय.आय.टी. मुंबई यांचेमार्फत चौकशी केली असून त्यांचेकडून प्राप्त अहवालानुसार रस्त्याच्या बाह्य रेषेवरील आर.ई. वॉलच्या खाली मागाहून बांधण्यात आलेल्या नाल्यामुळे रस्त्याखालील मुरुमाची आवश्यकतेनुसार दबाई शक्य न झाल्याने रस्त्यांच्या थरांमध्ये सेटेलमेंट झाल्याने पोचमार्गाच्या कॉंक्रिट रस्त्यामध्ये तडा गेला असल्याची शक्यता नमूद केली आहे. तथापि, पुलाच्या आर.ई.वॉल मध्ये कोणताही स्ट्रक्चरल दोष नसल्याचे नमूद केले आहे. सदर प्रकरणी प्रकल्पाचे कंत्राटदार व प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार यांचेकडूनही खुलासा मागविण्यात आला होता. त्यांनी सादर केलेल्या खुलाश्यांनुसार प्रकल्पाचे काम योग्य पध्दतीने व गुणवत्तेनुसार करण्यात आल्याचे व रस्त्याला गेलेला तडा हा केवळ अत्यंत मर्यादित जागेत मागाहुन नाल्याच्या कामाचा समावेश केल्याने निर्माण झाला असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यांनी सादर केलेले खुलासे आय.आय.टी., मुंबई यांच्या अहवालानुरुप असल्याने सदर खुलासे एमएमआरडीएद्वारे स्विकारण्यात आलेले आहेत. त्यामुळे कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## माझगांव (मुंबई) येथे नेसबीट मार्गावरील एम.ए. रेसीडेन्सी या इमारतीच्या बांधकामात अनियमितता झाल्याबाबत

**(६) ११३८९ (२०-११-२०२१) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माझगांव (मुंबई) येथील नेसबीट मार्गावरील एम.ए.रेसीडेन्सी या इमारतीचे बांधकाम सुरु असून सदर इमारत बांधकाम प्रकल्पाच्या नकाशामध्ये सदर रस्ता ६.३५ मीटर इतक्या रुंदीचा दाखविण्यात आला असताना विकासकाकडून उक्त रस्ता अत्यंत अरुंद करण्यात आला आहे त्यामुळे रुग्णवाहिकासुध्दा त्या रस्त्यातून जात नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इमारत बांधकाम करतांना अडसर ठरत असलेल्या तेथील मंदिराची जागा बदलून ते मंदिर अन्य ठिकाणी स्थलांतरीत करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी कारवाई करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधींनी तत्कालीन नगरविकास राज्यमंत्री यांना दिनांक २४/०७/२०१९ रोजी वा त्या सुमारास निवदेन दिले आहे तसेच गृहनिर्माण मंत्री यांनी दिनांक १९/०३/२०२० रोजी आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांना संबंधितांवर कारवाई करण्याचे निदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार संबंधित विकासकाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) :** (१), (२) व (३) नाही, हे खरे नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईत डब्बेवाला भवन उभारण्याबाबत

**(७) ११५१६ (०६-०१-२०२२) श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील डब्बेवाल्यांसाठी तीन वर्षापूर्वी तत्कालीन नगरसेविका व विद्यमान महापौर यांनी "डब्बेवाला भवन" उभारण्याच्या मुंबई महानगरपालिकेत मांडलेल्या ठरावास मुंबई महानगरपालिकेने एकमताने मंजुरी दिल्यानंतर सदर प्रस्तावास मा.आयुक्त यांनी देखील मान्यता दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात त्यासाठी मागील तीन वर्षांपासून दरवर्षी रुपये १ कोटी इतकी आर्थिक तरतूद करण्यात येत असून डब्बेवाला भवनासाठी मुंबईत जागा उपलब्ध नसल्याचे कारणास्तव डब्बेवाला भवन उभारण्यात आले नसल्याने अर्थसंकल्पात दरवर्षी करण्यात येणारी आर्थिक तरतूद व्यपगत होत असल्याचे दिनांक २८ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तीन वर्षे उलटूनही डब्बेवाला भवन उभारण्यासाठी मुंबईत जागा उपलब्ध होत नसल्याने त्याबाबत डब्बेवाला असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांची मुंबईत माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान भेट घेऊन निवेदन सादर केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वारकरी भवनाचे धर्तीवर मुंबईत डब्बेवाला भवन उभारणार असे मा.मुख्यमंत्री महोदयांनी डब्बेवाला असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांना आश्वासन दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनुसार डब्बेवाला भवन उभारण्याबाबत पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) :** (१) दिनांक ०७/०३/२०१९ रोजीच्या महापालिकेच्या सभेत, मुंबईतील वारकरी भवनाच्या धर्तीवर मुंबईच्या डबेवाल्यांसाठी मध्यवर्ती ठिकाणी डब्बेवाला भवन उभारण्याबाबतच्या ठरावाची सूचना आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अभिप्रायासाठी पाठविण्यात आली होती.

सदर ठरावाच्या सूचनेनुसार, महापालिकेच्या प्रचलित अटी व शर्तींच्या अधीन राहून समाज कल्याण केंद्रासाठी आरक्षित असलेल्या इमारतीचा काही भाग डब्बेवाला भवन संस्थेस देता येईल, तसेच भविष्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेस अनारक्षित भूखंड प्राप्त झाल्यास, सदर भूखंडावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ३७ अन्वये सदर भूखंड डब्बेवाला भवनाकरिता आरक्षित करता येऊ शकतो असा प्रस्ताव महापालिकेकडे सादर करण्यात आला आहे व महापालिकेने दिनांक ३०/०९/२०२१ रोजीच्या सभेत सदर प्रस्ताव पुढील विचारासाठी तहकूब केला आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) डब्बेवाला भवन उभारण्याकरीता सन २०१८-१९ मध्ये रुपये १० लाख, सन २०१९-२० मध्ये रुपये १० लाख, सन २०२०-२१ मध्ये रुपये १० लाख आणि सन २०२१-२२ मध्ये रुपये १ कोटी इतकी तरतूद करण्यात आली असून, प्रत्यक्ष खर्च निरंक आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३), (४) व (५) मुंबईमध्ये डब्बेवाला भवनासाठी जागा उपलब्ध झाल्यानंतर व उपभोक्ता विभागाच्या प्रस्तावानुसार महानगरपालिका वास्तुशास्त्रज्ञ यांचेकडून मंजूर आराखडे प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना वैद्यकीय चाचणी अहवाल सादर करण्याची करण्यात आलेली सक्ती रद्द करण्याबाबत

**(८) १२०४७ (३०-०३-२०२२) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगार, कर्मचारी, अधिकाऱ्यांना ५५ वर्षानंतर सेवा सातत्य सुरु ठेवण्यासाठी तीन महिने आधी महापालिकेला वैद्यकीय चाचणी अहवाल सादर करण्याची सक्ती केल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना सामान्य नागरिकांच्या रांगेत उभे राहून वैद्यकीय तपासण्या करुन घ्याव्या लागत असल्याने कोविड संसर्ग पसरण्याची शक्यता निर्माण झाल्याने आधीपासून सूरु असलेली ५८ वर्षापर्यंतची सेवाकाळ पध्दत कायम ठेवून सक्तीचे परिपत्रक रद्द करण्याची मागणी महानगरपालिकेच्या कर्मचारी कामगार सेनेने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कामगार, कर्मचारी, अधिकाऱ्यांची ५५ वर्षानंतर सेवा सातत्य सुरु ठेवण्यासाठी वैद्यकीय चाचणी अहवाल सादर करण्याची सक्ती रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत वयाच्या ५५ वर्षांनंतर सेवासातत्य देण्याकरिता वैद्यकीय चाचणी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिनांक २४/०३/२०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये पारित करण्यात आले आहेत.
(२) काही कामगार संघटनांनी वयाच्या ५५ वर्षांनंतर बृहन्मुंबई महानगरपालिका सेवेत सेवासातत्य देण्याकरीता वैद्यकीय तपासणी करण्याची अट रद्द करण्याबाबत निवेदने सादर केली आहेत असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) दिनांक ०३/०५/२०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये, कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे वैद्यकीय परिक्षणाची अट सहा महिन्यांकरिता स्थगित करण्यात आली.

तद्नंतर ५५ वर्षांपुढील सेवासातत्य देण्याकरिता रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी उपस्थित राहणाऱ्या कर्मचाऱ्यांची योग्य ती काळजी घेण्याकरिता संबंधित रुग्णालयांना सूचना देण्यात आल्या आहेत असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहरात मॉल उभारण्याबाबत

**(९) १२७४३ (३०-०३-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळावी याकरिता महानगरपालिकेने नागपूर शहरात सहा मॉल उभारण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यापैकी चार जागांवर भूमिपूजन करण्यात आले परंतु मागील साडेचार वर्षात मॉल्स उभारणीसंदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर शहरात मॉल्स उभारणीकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) नागपूर महानगरपालिकेमार्फत बांधा, वापरा व हस्तांतरित करा या धर्तीवर नागपूर शहरामध्ये एकूण ६ व्यावसायिक संकुलाचे बांधकाम करण्याचे सन २००६-०७ मध्ये प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि, सदर ६ मॉलपैकी, जिंजर मॉल जरीपटका व दानागंज कर्मिशीयल कॉम्प्लेक्स या दोन मॉलचे काम प्रगतीपथावर असून उर्वरित ४ व्यावसायिक संकुलाच्या बांधकामाचा करारनामा महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र. १४९, दिनांक १२/०९/२०१७ अन्वये रद्द करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर येथील महाल या भागात दुसऱ्या रघुजी भोसलेंचा राजवाडा या ऐतिहासिक वास्तूचे जतन करण्याबाबत

**(१०) १२७४४ (३०-०३-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील महाल या भागात दुसऱ्या रघुजी भोसलेंचा राजवाडा अर्थात वर्तमानातील सिटी कोतवाला पोलीस ठाण्याच्या आवारात केळीबाग रोडवर असलेल्या सुमारे ३०० वर्षे जुन्या मंदिरातील लाकडी डोलारा ढासळत असल्याचे दिनांक २६ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर ऐतिहासिक वास्तूचे जतन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (२३-०९-२०२२) :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

प्रश्नाधिन वास्तुची मालकी खाजगी संस्थेची असून सदर वास्तू नागपूर शिक्षण मंडळाच्या ताब्यात आहे. सबब, नागपूर शिक्षण मंडळाने नागपूर हेरिटेज संवर्धन समितीची मंजुरी घेऊन या वास्तूचे जतन व संवर्धन करणे आवश्यक आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याला बाधा येत असलेल्या कलिना (मुंबई) विद्यानगरी मार्गावरील हॉटेल नित्यानंद तोडण्याबाबत

**(११) १३२८७ (०६-०४-२०२२) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याला बाधा येत असल्यामुळे सन २०१४ मध्ये कलिना (मुंबई) विद्यानगरी मार्गावरील हॉटेल नित्यानंद तोडून टाकण्याची महापालिकेने नोटीस देवूनही कोणतीही कारवाई केली नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी जवळपास ८०० छोटी-मोठी दुकाने, हॉटेल, झेरॉक्स, पान टपरी, चहा विक्रेता, फळविक्रेता, भाजीपाला विक्रेता अशी दुकाने तसेच व्यायाम शाळा व पोलीस चौकी तोडून टाकण्यात आली परंतु हॉटेल नित्यानंद तोडण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हॉटेल नित्यानंदाचे २५० स्केवे. फुटाचे जुने बांधकाम होते तेथे आता १२०० ते २००० स्केवे. फुट एवढे अनधिकृत बांधकाम केलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने हॉटेल नित्यानंद तोडण्याबाबत, तसेच सदरहू हॉटेल तोडण्याच्या कारवाईकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासनातील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन तोडण्यात आलेल्या ८०० दुकानांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) :** (१), (२) व (३) सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याच्या रुंदीकरण प्रकल्पादरम्यान हॉटेल नित्यानंद हे बाधित होत असल्याने सदर हॉटेलला बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ अन्वये नोटीस बजावण्यात आली आहे.

तथापि, हॉटेल नित्यानंद यांचे प्रकरण मा.उच्च न्यायालय व मा.शहर दिवाणी न्यायालय, दिंडोशी येथे न्यायप्रविष्ट असल्याने अद्याप निष्कासन कारवाई करण्यात आलेली नाही.

सदर रस्ता रुंदीकरण प्रकल्पात नियमित रस्ता रेषेला बाधित झालेल्या दुकान तसेच इतर संरचना यांचे निष्कासन करण्यात आले आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याच्या रुंदीकरण प्रकल्पादरम्यान बाधित एकूण १६० व्यावसायिक गाळेधारकांपैकी ५९ पात्र बाधित व्यावसायिक गाळेधारकांची पर्यायी व्यवस्था म्हणून त्यांचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत देण्यात आलेल्या एस.व्ही. पटेल कॉम्प्लेक्स, मानखुर्द व नटवर पारेख कंपाऊंड, गोवंडी या ठिकाणच्या व्यावसायिक गाळयांमध्ये पुनर्वसन करण्यात आले आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ‘फिरते अन्न वितरण वाहन’ वाटपाबाबत धोरण निश्चित करण्याबाबत

**(१२) १३३०० (३०-०३-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आर्थिक वर्ष २०२१-२२ मधील अर्थसंकल्पात ठराविक गरजू व्यक्तींना ‘फिरते अन्न वितरण वाहन’ देण्याची तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अनेक नगरसेवकांनी आपल्या विशेष निधीतून ‘फिरते अन्न वितरण वाहन’ देण्याची तयारी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ‘फिरते अन्न वितरण वाहन’ वाटपाबाबत अद्यापपर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणतेही धोरण मंजूर केले नसून वाहतूक पोलीस आणि अग्निशमन दलानेही “ना-हरकत प्रमाणपत्र” दिले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने 'फिरते अन्न वितरण वाहन' वाटपाबाबत धोरण निश्चित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत आर्थिक वर्ष २०२१-२२ मधील अर्थसंकल्पात ठराविक गरजू व्यक्तींना "फिरते अन्न वितरण वाहन" देण्याची तरतूद करण्यात आलेली नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) हे खरे नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) व (४) फिरत्या वाहनांद्वारे खाद्यपदार्थांची विक्री करण्याबाबतचे धोरण महानगरपालिकेच्या मंजुरीकरीता सादर करण्यात आले आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दहिसर आणि बोरीवली येथील पदपथ भिकारी आणि गर्दुर्लामुक्त करण्याबाबत

**(१३) १३३९८ (३०-०३-२०२२) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहिसर रेल्वे स्थानक (पश्चिम) आणि बोरीवली रेल्वे स्थानक (पश्चिम) पै नगर परिसरातील पदपथांवर भिकारी आणि गर्दुल्ल्यांना वास्तव्य असल्याने स्थानिक नागरिकांची गैरसोय होत असल्याचे दिनांक १० फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर ठिकाणची पदपथ कायमस्वरुपी भिकारी आणि गर्दुल्ला मुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) :** (१) दहिसर रेल्वे स्थानक (पश्चिम) पदपथावर भिकाऱ्यांचे वास्तव्य असल्याचे दिनांक १०/०२/२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे.

तथापि, आर/मध्य विभागाच्या बोरीवली रेल्वे स्थानक (पश्चिम) पै नगर परिसरातील पदपथांवर भिकारी व गुर्दुल्यांचे वास्तव दिनांक १०/०२/२०२२ वा त्यासुमारास आढळून आले नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) दहिसर रेल्वे स्थानक (पश्चिम) येथील पदपथावर बांधलेल्या कच्च्या झोपड्या दिनांक २६/०२/२०२२ व दिनांक २३/०३/२०२२ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासित केल्या आहेत.

तसेच, बोरीवली रेल्वे स्थानक (पश्चिम) येथील स्वामी विवेकानंद रस्त्याच्या पदपथावर बांधण्यात आलेल्या अनधिकृत कच्च्या झोपड्यांवर दिनांक २२/०२/२०२२ व दिनांक ०२/०३/२०२२ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासन कारवाई करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेंतर्गत शहरी बेघरांचे सर्वेक्षण दिनांक २४/०३/२०२२ ते दिनांक ३१/०५/२०२२ या कालावधीकरीता इन्डो ग्लोबल सोशल सर्व्हिस सोसायटी (आयजीएसएसएस) या संस्थेला देण्यात आले असून, बेघर सर्वेक्षणाअंती येणाऱ्या संस्थेच्या आधारे बेघरांकरीता बृहन्मुंबई महानगरपालिका स्तरावर स्वतंत्र धोरण ठरविण्याची प्रक्रिया सुरु आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील विकासक आणि कॉर्पोरेट कंपन्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेचा मालमत्ता कर थकविल्याबाबत

**(१४) १३५३४ (३०-०३-२०२२) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विकासक आणि कॉर्पोरेट कंपन्यांनी रुपये २३०० कोटींचा मालमत्ता कर बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे भरला नसल्याचे दिनांक ११ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने थकबाकीदार विकासक आणि कॉर्पोरेट कंपन्यांकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेचा थकीत मालमत्ता कर वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता करातील २०० थकीत प्रकरणांमध्ये मोठ्या थकबाकीदारांकडील एकूण रुपये २२९४.९५ कोटी रकमेच्या थकबाकीपैकी, वसुलीच्या कार्यवाहीनंतर माहे मार्च, २०२२ मध्ये एकूण २ प्रकरणांमध्ये रुपये २०.७३ कोटी रकमेची करवसुली करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत दिनांक १ जून, २०२२ पर्यंत एकूण ७७ प्रकरणांमध्ये वसुलीच्या कारवाईनंतर रुपये २२१.८६ कोटी रकमेची करवुसली करण्यात आली आहे व उर्वरित १२३ प्रकरणांमध्ये वसुलीची कार्यवाही सुरु आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) मालमत्ता कराची थकबाकी मोठ्या प्रमाणात असल्याचे निदर्शनास आल्यावर जास्तीत जास्त थकीत करवसुली करण्यासाठी प्राधान्यक्रम ठरवून त्यानुसार युध्दपातळीवर कार्यवाहीचा आराखडा ठरविण्यात आला. मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील कलम २०२ ते २०६ च्या तरतुदींनुसार जल जोडणी खंडीत करणे, चल मालमत्तांची अटकावणी, अचल मालमत्तांची जप्ती अटकावणी व लिलाव इ. कार्यवाही करण्यात आली व येत आहे.

तसेच, सर्व थकबाकीदारांवर थकीत मालमत्ता कराच्या देय दिनांकापासून २% प्रतिमाह या दराने दंड आकारणी करण्यात आली आहे. भांडवली मुल्याधारित करप्रणालीमध्ये मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील कलम २०६ च्या तरतुदीनुसार थकीत मालमत्ता कराच्या वसुलीसाठी स्थावर

मालमत्तांची विक्री करण्याबाबतच्या मानक कार्यपध्दतीस प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली आहे. त्याअनुषंगाने स्थावर मालमत्तेच्या जाहीर लिलावाची प्रक्रिया राबविण्यासाठी एजन्सीची नेमणूक करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठवाड्यातील रेल्वेवर पडलेल्या दरोड्याबाबत

**(१५) १३८५७ (०३-०७-२०२२) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यातील औरंगाबाद ते परभणी दरम्यान धावणाऱ्या नंदीग्राम, देवगिरी तसेच परभणी ते परळी दरम्यान धावणाऱ्या रेल्वेवर दरोडे पडण्याचे प्रकार वाढले असल्याने प्रवाशांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशीच्या करून रेल्वे प्रवाशांमध्ये सुरक्षिततेचे वातावरण निर्माण व्हावे तसेच भविष्यात प्रवाशांमध्ये भितीचे वातावरण निर्माण होऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाच्यावतीने कोणत्या उपाय योजना करण्यात आल्या आहेत वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०२२) :** (१) मराठवाड्यातील औरंगाबाद ते परभणी दरम्यान धावणाऱ्या नंदीग्राम, देवगिरी तसेच परभणी ते परळी दरम्यान धावणाऱ्या रेल्वेवर दरोडे पडण्याचे प्रकार घडलेले नाहीत.

तथापि, नंदीग्राम व देवगिरी एक्सप्रेसवर रेल्वे स्टेशन औरंगाबाद ते मनमाड दरम्यानच्या रेल्वे पोलीस ठाणे औरंगाबाद हद्दीतील पोटूळ रेल्वे स्टेशन जवळ पडलेल्या दोन दरोड्यांची माहिती अनुक्रमे खालीलप्रमाणे आहे :

(अ) नंदीग्राम एक्सप्रेसवर दिनांक ०२/०४/२०२२ रोजी दरोड्याचा गुन्हा घडला असून सदर प्रकरणी रेल्वे पोलीस ठाणे, औरंगाबाद येथे गु.र.नं.११६/२०२२, भा.दं.वि. कलम ३९४, ३९५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(ब) देवगिरी एक्सप्रेसवर दिनांक २२/०४/२०२२ रोजी दरोड्याचा गुन्हा घडला असून सदर प्रकरणी रेल्वे पोलीस ठाणे, औरंगाबाद येथे गु.र.नं.१४१/२०२२, भा.दं.वि. कलम ३९२, ३९५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) सदर दोन्ही गुन्हे उघडकीस आले असून त्यामध्ये एकूण ०७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर दोन्ही गुन्हे सध्या तपासाधीन आहेत.

तसेच अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता लोहमार्ग पोलीस व रेल्वे सुरक्षा बल चे अधिकारी यांच्यामध्ये दिनांक २२/०४/२०२२ रोजी समन्वय बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीतील निर्णयानुसार जालना-मनमाड रेल्वे मार्गावर गार्ड नेमण्यात आले आहेत तसेच, नंदीग्राम, देवगिरी, राजाराणी एक्सप्रेस व डेमो ट्रेन येथे आरपीएफ व जीआरपी पोलीस अंमलदार यांची पेट्रोलिंगकरीता नेमणूक करण्यात आली आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

## मंत्रालयातील गृहखात्यातील कर्मचारी "जॉब रॅकेट" चालवित असल्याबाबत

**(१६) १४०३८ (०८-०७-२०२२) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंत्रालयातील गृहखात्यातील कर्मचारीच "जॉब रॅकेट" चालवित असल्याचे माहे एप्रिल, २०२२ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाबाबत नांदेड येथील हिब्बट गावातील शेतकरी शंकर मुंढे यांनी दोन महिन्यापूर्वी मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात तिघां विरुध्द गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औरंगाबादला एसआरपीएफमध्ये नोकरी लावून देण्यासाठी राहूल धनंजय देशमुख व सुधीर नावाच्या व्यक्तीने गृहखात्यातून बोलत असल्याचे सांगून नोकरीची ऑर्डर कॉपी देण्यासाठी तक्रारदार शंकर मुंढे यांच्याकडून साडे तीन लाख रुपये घेतले परंतु अद्यापही ऑर्डर कॉपी दिली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, सदर चौकशीअंती तक्रारदार शंकर मुंढे यांना भेटलेल्या मंत्रालयातील कर्मचारी तसेच सदर "जॉब रॅकेट" मध्ये सहभागी असणाऱ्या सर्व संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०२-०९-२०२२) :** (१) व (२) सदर प्रकरणात नांदेड येथील हिब्बट गावातील शेतकरी यांच्या तक्रारीनुसार मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे येथे दिनांक ३०/०३/२०२२ रोजी गु.रं.क्र. ८०/२२ भा.दं.वि. कलम ४२०, ३४ अन्वये गुन्हा नोंद आहे.
(३) हे खरे आहे. सदर प्रकरणातील प्रमुख आरोपी याने फिर्यादीचा विश्वास संपादन करून तो स्वत: औरंगाबाद एसआरपीएफ मध्ये नोकरीस असून फिर्यादीच्या मुलांना औरंगाबाद एसआरपीएफ मध्ये नोकरीस लावण्याचे आमिष दाखवून फिर्यादीस एकूण रुपये ३,५०,०००/- घेतले असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले आहे.
(४) व (५) सदर प्रकरणाच्या तपासात मंत्रालयात कंत्राटी पध्दतीवर शिपाई म्हणून नोकरी करणाऱ्या दोन व्यक्तींनी मदत केल्याचे आरोप करण्यात आले असून नमुद दोन्ही आरोपींना फौ.दं.प्र.सं. कलम ४१(अ)(१) अन्वये नोटीस देण्यात आली आहे. तसेच यातील प्रमुख आरोपीच्या ठावठिकाणाबाबत चौकशी सुरु आहे. तसेच गुन्हा उघडकीस आणण्याच्यादृष्टीने अधिक माहिती मिळवून गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबरनाथ तालुक्यातील कुशिवली धरणासाठी भूसंपादन केलेल्या जमिनीचा मोबदला मूळ वारसांऐवजी अनोळखी व्यक्तीने बनावट कागदपत्रांव्दारे बळकाविल्याबाबत

**(१७) १४०६० (३०-०६-२०२२) श्री.राजहंस सिंह, श्री.चंदूभाई पटेल :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर प्रांत कार्यालयांतर्गत अंबरनाथ तालुक्यातील कुशिवली धरणासाठी भूसंपादन केलेल्या जमिनीचा मोबदला मयत मूळ वारसांऐवजी अनोळखी व्यक्तीने बनावट कागदपत्रांव्दारे बळकाविल्याचा प्रकार माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मध्यवर्ती पोलीस ठाण्यात आतापर्यंत तीन गुन्हे नोंदविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी पोलिसांनी उल्हासनगर प्रांत कार्यालयातून सेवानिवृत्त झालेल्या नायब तहसिलदाराला अटक केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, सदर चौकशीअंती शासनाची करोडो रुपयांची फसवणूक करणाऱ्या सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०२-०९-२०२२) :** (१) होय.
(२) प्रस्तुत प्रकरणात दिनांक ०७/१०/२०२१ रोजी प्रथम मध्यवर्ती पोलीस ठाणे, उल्हासनगर येथे गु.र.क्र.३३२/२०२१, भा.दं.वि कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४१९, ५११, १८२, ३४, २०१, १६६, १६७, १०९, ४०९, ४७७(ए), १२०(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रस्तूत प्रकरणासंबधी एकूण पाच गुन्हे दाखल आहेत.
(३) सदर गुन्ह्यातील आरोपी तत्कालीन प्रभारी अधिकारी भूसंपादन शाखा तथा नायब तहसिलदार (से.नि.) यांना दिनांक ०१/०६/२०२२ रोजी अटक करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रस्तूत प्रकरणी पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांनी विशेष तपास पथक (SIT) स्थापन केले असून दाखल असलेल्या पाच गुन्ह्यांपैकी चार गुन्ह्यांमध्ये एकूण ४३ आरोपीना अटक करण्यात आली आहे. गुन्ह्यातील अटक आरोपी व संशयित आरोपी यांची त्यांच्याशी संबंधित बँकांकडून खाते विषयक तपशिल प्राप्त करून त्यासंबंधी पुरावा गोळा करून गुन्ह्याचा अधिक तपास चालू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नारनाळी (ता.कंधार,जि.नांदेड) येथील एक बालकाचे अपहरण करुन खून केल्याबाबत

**(१८) १४११५ (३०-०६-२०२२) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नारनाळी (ता.कंधार,जि.नांदेड) येथील दिनांक २८ मार्च,२०२२ रोजी एका ४ वर्षाच्या मुलाचे अपहरण करुन खून करण्यात आला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मुलाचे प्रेत धर्माबाद तालुक्यात येल्लापूरच्या शिवारात पोत्यात आढळून आले हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी कंधार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या संदर्भात पोलिसांनी या प्रकरणी तपास करुन आरोपींवर कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०२२) :** (१) नारनाळी, तालुका कंधार, जिल्हा नांदेड येथून, ४ वर्षीय मुलाचे त्याच्या पित्याने दिनांक २८/०३/२०२२ रोजी अपहरण करून गोदावरी नदीच्या पात्रातील पाण्यामध्ये टाकून देऊन त्याची हत्या केली आहे.

(२) सदर गुन्ह्यातील अपहरण करण्यात आलेल्या मुलाचे प्रेत दिनांक ३०/०३/२०२२ रोजी येल्लापूर, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड येथील गोदावरी नदीच्या पात्रातील पाण्यामध्ये एका पोत्यात आढळून आले आहे.

(३) सदर प्रकरणी कंधार पोलीस ठाणे, नांदेड येथे गु.र.नं.९९/२०२२, भा.दं.वि. कलम २०१, ३०२, ३६३, ३६४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) सदर प्रकरणी कंधार पोलीस ठाणे, नांदेड येथे दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने चौकशी करण्यात येऊन आरोपी पित्याला अटक करण्यात आली असून मा.न्यायालयाकडून त्याची पोलीस कस्टडी रिमांड घेऊन तपास करण्यात आला आहे.

तपासामध्ये मृत्यू पावलेल्या मुलाचा पिता हाच आरोपी असल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपीवर मा.न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत सदर प्रकरणी खटला न्यायप्रविष्ट आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

## तामसा (ता.चार, जि.नांदेड) येथील डॉ.सचिन सुर्यवंशी यांच्यावर जीवघेणा हल्ला झाल्याबाबत

**(१९) १४९११ (३०-०६-२०२२) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तामसा (ता.चार, जि.नांदेड) येथील डॉ.सचिन सुर्यवंशी यांच्यावर मध्यरात्रीनंतर जीवघेणा हल्ला करुन गंभीर जखमी केल्याने शहर व परिसरात खळबळ उडाली असल्याचे माहे जून, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त हल्लेखोरला पकडण्यात पोलिसांना यश आले आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींतावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०२२) :** (१) व (२) डॉ.सचिन सुर्यवंशी यांनी तामसा पोलीस स्टेशन, जिल्हा नांदेड येथे सदर प्रकरणी माझी कोणाविरुध्द तक्रार नसल्याचा व त्यांना पाय घसरुन पडल्याने मार लागल्याचा जबाब दिला असून कोणत्याही व्यक्ती विरोधात तक्रार दिलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) विलंब झालेला नाही.

---

## तुळजाभवानी मंदिराचे सिंहासन दानपेटी लिलावामध्ये झालेला आर्थिक गैरव्यवहार

**(२०) १४९७० (१८-०७-२०२२) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापूर येथील तुळजाभवानीदेवीच्या मंदिरातील (जि.उस्मानाबाद) सन १९९१ ते २००९ या कालावधीत सिंहासन दानपेटी लिलाव प्रक्रियेत आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याप्रकरणी शासनाने गुन्हा अन्वेषण विभागामार्फत (सीआयडी) चौकशी करण्याच्या दिलेल्या आदेशानूसार गुन्हा अन्वेषण विभागाने चौकशी करुन त्याबाबत सविस्तर अहवाल दिनांक २७ सप्टेंबर, २०१७ रोजी म्हणजेच पाच वर्षापुर्वीच सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राप्त माहितीनुसार गुन्हा अन्वेषण विभागाचे या आर्थिक गैरव्यवहारात ९ लिलावदार, ५ तहसिलदार, १ लेखापरिक्षक, १ धार्मिक सहव्यवस्थापक यांच्यावर ठपका ठेवण्यात आला असल्याचे तथापि, देवस्थानाचे विश्वस्त असतानाही मा.जिल्हाधिकारी यांचे नाव वगळण्यात आल्याचे दिनांक २८ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पाच वर्षापुर्वी गुन्हा अन्वेषण विभागाने शासनास अहवाल सादर केलेला असताना शासनाने सदर अहवाल अद्याप जाहीर केला नसल्याचे दिनांक २८ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त अहवाल जाहीर करण्याबाबत तसेच आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०२२) :** (१) व (२) सदर प्रकरणात गुन्हे अन्वेषण विभागाने चौकशी करुन याबाबतचा चौकशी अहवाल शासनास सादर करण्याकरिता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २७/०९/२०१७ रोजी सादर केला होता.

तथापि, पोलीस महासंचालक कार्यालयाने सदर अहवालामध्ये असलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याच्या अनुषंगाने १७/११/२०१७ रोजी अहवाल गुन्हे अन्वेषण विभागास परत केला होता.

गुन्हे अन्वेषण विभागाने त्रुटींची पूर्तता करुन सदर अहवाल पुन्हा पोलीस महासंचालक कार्यालयाला दिनांक २१/०२/२०१८ रोजी सादर केला आहे.

पोलीस महासंचालक कार्यालयाकडून सदर प्रकरणाचा अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर दिनांक ३०/०८/२०१८ च्या पत्रान्वये गुन्हे अन्वेषण विभागाला फेरतपासणी करण्याबाबत शासनाने कळविले होते.

सदर अहवालाची फेरतपासणी गुन्हे अन्वेषण विभागाकडून करण्यात येऊन याबाबतचा अहवाल दिनांक ०३/०२/२०२० रोजी शासनास सादर करण्यात आला आहे.

(३) तुळजापूर देवस्थान विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, उस्मानाबाद व इतर यांनी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान तुळजापूर देवस्थानाचे अनुषंगाने प्रशासकीय कामात अनियमितता व निष्काळजीपणा केल्याचे दिसून आले आहे. परंतु त्यांच्या कृत्यात गुन्ह्याचे स्वरुप (Criminal liability) दिसून येत नसल्याने त्यांच्याविरुध्द विभागीय स्तरावर प्रशासकीय कारवाई करण्याबाबत सदर अहवालात शिफारस करण्यात आली होती.

(४) सदर प्रकरणात पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून फेर चौकशी अहवाल दिनांक ०३/०२/२०२० रोजी शासनास सादर करण्यात आला आहे. याबाबत शासनाकडून घेण्यात आलेल्या निर्णयाबाबत पोलीस महासंचालक यांना दिनांक १५/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(५) सदर प्रकरण सन १९९१ ते २००९ या कालावधीतील असल्याने इतक्या जुन्या कालखंडातील मुद्यांबाबत आजघडीस व तीही सरसकट सर्व अधिकाऱ्यांविरुध्द कार्यवाही प्रस्तावित करणे संयुक्तिक ठरत नसल्याने शासनाने सदर प्रकरणाची चौकशी या स्तरावर बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

तसेच सदर चौकशी अहवालातील मंदीर प्रशासनामध्ये सुधारणा करण्याबाबतच्या शिफारशींच्या अनुषंगाने विधी व न्याय विभागाकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) विलंब झालेला नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.